









आयएमएचे डॉक्टर २३ एप्रिलला काळा दिवस पाळणार!

**जनमत सर्वसामान्यांचे**

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव

कोल्हापूर अंबाबाई देवीचे दर्शन

मंगळवारी दुपारी देवीची भक्तांच्या उपस्थितीत अलंकार महापूजा करण्यात आली. त्याप्रसंगीचे देवीचे मनोहर रूप

दैनिक सोलापूर e-mail - dainikjanmat@gmail.com | बुधवार २२ एप्रिल २०२० | वर्ष १० | अंक २६१ | पृष्ठे ८ | किंमत ३ रुपये

## शेंडुरे महाविद्यालयाच्या वतीने फळवाटप

रेंदाळ,दि. २१ : हातकणंगले तालुक्यातील हुपरी येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हुपरी आणि रेंदाळ येथे कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या पोलिस कर्मचारी , आरोग्य कर्मचारी , ग्रामपंचायत कर्मचारी यांना फळवाटप व गुलाब पुष्प देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.यावेळी रेंदाळ गावाचे लोकनियुक्त सरपंच विजय माळी , तंटामुक्त अध्यक्ष धनाजी करवते , एम.बी.माळी , प्रकाश पाटील , मन्सूर नाईकवाडे , बंडा पोवार , तानाजी घोडेस्वार आदिसह राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी , ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी श्रीमती संध्या माने यांनी केले होते.

1/5/2020- कोरोना काळात दत्तक गाव तळंदगे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक "आरोग्य सांभाळा, कोरोना  टाळा" ही प्रबोधनात्मक रांगोळी काढताना आणि कोरोना संदर्भामध्ये नागरिकांना प्रबोधन आणि मास्क वाटप करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयसेवक







मे २०२० - कोवीड 19 या संसर्गजन्य रोगापासून संरक्षण करणारे कोरोना यौध्दे पोलिस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा फुल आणि फळ देऊन सत्कार करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक





ऑगस्ट 2020- हुपरी नगरपालिकेच्या निर्देशानुसार येथील प्रभाग आठ मधील नागरिकांचा आरोग्य सर्वे करताना कार्यक्रम अधिकारी संध्या माने आणि सोबत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक.

सकाळ » TODAY शनिवार, २६ सप्टेंबर २०२० २





हुपरी : शेंडुरे महाविद्यालयात 'माझे कुटुंब माझी जबाबदारी'विषयक प्रतिज्ञा देताना प्रा. संध्या माने. सोबत प्रा. संभाजी गावडे आदी.

# शेंडुरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन

**हुपरी :** रयत शिक्षण संस्थेच्या येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा केला. 'फिट इंडिया मूव्हमेंट' आणि 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या विषयावर तयार केलेल्या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्या डॉ. पी. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणही केले. कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी श्रीमती प्रा. संध्या माने यांनी केले. सौरभ मुधाळे, ऋषीकेश शिंदे, सूरज बारगीर, सिंम्पल माळी, ज्योती वाईंगडे आदींचे सहकार्य लाभले.




# हुपरीत रक्तदान शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

। द वाळवा क्रांती ।

------ रेंदाळ/प्रतिनिधी ------

सध्या संपूर्ण भारतभर कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रुग्णासाठी रक्तपुरवठ्याची कमतरता भासत आहे.रक्त कृत्रिम पद्धतीने तयार होत नाही. त्यामुळे रक्तासाठी मनुष्याला गरजू व्यक्तीला जीवनदान मिळते.माणूसकीच्या नात्याने प्रत्येकाने रक्तदान करणे गरजेचे आहे. रक्ताची कमतरता भासू नये म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे व आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी महाराष्ट्रातील नागरिकांना , सामाजिक संस्था , तरूण मंडळे , शैक्षणिक संस्था यांना रक्तदान करण्याचे आव्हान केले या आव्हानाला प्रतिसाद देत हातकणंगले तालुक्यातील हुपरी येथील रयत शिक्षण संस्था संचलित चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि श्री विश्वमुख गणेश कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात शासनाच्या नियमांचे पालन करत ६५ रक्तदात्यांनी रक्त देऊन सहकार्य केले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ.पी.बी.पाटील ,प्राध्यापक डॉ.संभाजीराव गावडे , प्राध्यापक सौ.सुप्रिया खोले ,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्रीमती संध्या माने , कार्यक्रम अधिकारी चंद्रकांत गिरी ,आकाश बिरांजे , श्रावण बिरांजे , दिलिप वड्ड , आनंदराव देसाई , आनंदराव जाधव , शहाजी पवार आदिसह महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थी , तसेच रक्तदाते , प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी वैभवलक्ष्मी ब्लड बँक कोल्हापूर यांचे अनमोल सहकार्य लाभले.








# हुपरी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त एक दिवस वृद्धाश्रमासाठी उपक्रम

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

हातकणंगले तालुक्यातील हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई- शांताप्पा शेंडूरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग , आजी माजी विद्यार्थी- विद्यार्थीनी,व शिवस्वराज्य फौडेशन यांच्यावतीने जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त एक दिवस वृद्धाश्रमासाठी हा अनोखा उपक्रम साजरा करुन एक आगळावेगळा आदर्श समाजापुढे निर्माण केला आहे .



एक दिवस वृद्धाश्रमासाठी या अनोख्या उपक्रमप्रसंगी मान्यवर.

या उपक्रमा अंतर्गत घोसरवाड,ता.शिरोळ येथील 'जानकी वृद्धाश्रमास' भेट देऊन या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमामध्ये श्रमदानाचे काम केले. या वृद्धाश्रमाचे संस्थापक प्रमुख बाबासाहेब पुजारी यांनी वृद्धाश्रमाबद्दल संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्ववर्गणीतून जीवनावश्यक उपयोगी किराणा मालाचे साहित्य वृद्धाश्रमास भेट दिले.विद्यार्थ्यांनी तेथील वृद्धांशी सुसंवाद साधून त्याच्यासमोर मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला.

या उपक्रमास प्राचार्या सौ.पी.बी. पाटील तसेच प्रा. डॉ.संभाजीराव गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.सदर कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीमती संध्या माने यांनी केले.

या कार्यक्रमास वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.विनोद अवघडे , शिवस्वराज्य फाउंडेशनचे अध्यक्ष सुमित कांबळे , सौरभ मुधाळे ,ओमकार जगदाळे ,सुशांत नलवडे आदिसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक , आजी माजी विद्यार्थी - विद्यार्थ्यांनी ,शिवस्वराज्य फाऊंडेशन चे सदस्य उपस्थित होते.